
# नवनीत

मे २०१४



# मुखपृष्ठाविषयी

जुलै २०१३ मध्ये शाळेत ग्रॅनी क्लाउड हा कार्यक्रम सुरु झाला. सहावी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांना व्हीडिओ चॅटच्या मदतीने परदेशातील काही आजी-आजोबांशी दर आठवड्याला एक तासभर इंग्रजीमध्ये गप्पा मारण्याची संधी मिळणार होती.

या आजी-आजोबांना मराठी येत नाही. त्यामुळे चुकत-माकत का होईना मुलांना इंग्रजीच बोलण्याशिवाय पर्याय नव्हता. सुरुवातीला परदेशी उच्चार समजणे अवघड जायचे. जे काही सांगायचे आहे त्यासाठी इंग्रजी शब्दच सुचायचे नाहीत. त्यामुळे कधी हातवारे करत, कधी वस्तू दाखवत, कधी डिक्शनरी वापरून तर कधी शिक्षकांची मदत घेऊन आपले म्हणणे पलीकडे पोचवण्याचा जोरदार प्रयत्न चालायचा.

आज ७-८ महिन्यांनंतर या दोन वर्गातील मुलांमध्ये झालेला बदल लक्षणीय आहे. एक गोष्ट मुलांमध्ये प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे मुले नुसते इंग्रजी बोलत नाहीत तर त्या भाषेमध्ये विचार देखील करू लागली आहेत. आपल्या ग्रॅनींशी काय बोलायचे, त्यांना काय दाखवायचे याचे नियोजन गटा -गटांमध्ये चालू असते. मुले खेळताना, इकडे तिकडे फिरतानादेखील चर्चा करत असतात. यामुळे आपसूकच त्यांचा सहभाग अधिक कल्पक आणि नियोजनबद्ध होऊन जातो. मुले या शिकण्याचा आनंद घेतातच पण हे शिकणे जगतात देखील.

इंग्रजी ऐकून-बोलून ही भाषा वापरण्याच्या मुलांच्या आत्मविश्वासात निश्चितच फरक पडला आहे. परंतु आपण जे काही करतो, शिकतो त्याचा मुलांना किती अभिमान वाटू शकतो आणि त्यामुळे नवे शिकण्याचा उत्साहही किती वाढू शकतो हे ग्रॅनी क्लाउडच्या निमित्ताने समोर आले. ग्रॅनींकडून मिळणाऱ्या कौतुक आणि प्रोत्साहनाने शाळेतल्या उपक्रमांकडे बघण्याचा मुलांचा दृष्टिकोनच पूर्ण बदलेला जाणवतो. ग्रॅनींशी बोलण्यासाठी, आपण तयार केलेल्या वस्तू दाखवण्यासाठी, तबला-पेटी कम्प्युटर रूममध्ये आणून ग्रॅनींना गाणी आणि प्रार्थना म्हणून दाखवण्यासाठी मुले उत्साहानी नुसती फसफसत असतात.

मुले इंटरनेटवरती बराच वेळ काम करतात. नवनवीन माहिती मिळवतात. एखाद्या प्रश्नाविषयी माहिती शोधून ती समजून घेऊन ती कशी मांडायची हे ठरवतात. प्रत्येक गटाची ही पद्धत वेगळी असते. त्यामुळे नवीन शिकणे आणि ते आत्मसात करणे याची प्रत्येकाची वेगळी प्रकिया पहायला मिळते. यातून मुले बरीच संगणक कौशल्येही आपसूकच शिकतात.

लाखो मैल दूर असणाऱ्या या ग्रॅनीदेखील मुलांकडून खूप काही शिकत असतात. प्रगत शिक्षण संस्थेच्या मुलांबरोबर त्यांना काम करताना स्वतःची देखील तयारी करावी लागते असे कौतुकाचे बोल त्या सहज बोलून जातात.

मुलांचे आणि ग्रॅनींचे नाते जरी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जोडले गेले असेल तरी ते वर्गातील शिक्षकांइतकेच यशस्वी आणि भावनिक बनले आहे. ते एकमेकांच्या आवडी निवडी, सण, वाढदिवस हे सगळे लक्षात ठेवतात. एकमेकांना पत्र, ग्रीटिंग पाठवत असतात. ग्रॅनींचे आलेले पत्र, कार्ड मुले एखाद्या पारितोषिकासारखे जपून ठेवतात.

स्वतः ग्रॅनी क्लाउडचा भाग असलेल्या सहावीतल्या जितेंद्रने या नवनीतच्या मुखपृष्ठावरचे चित्र काढले आहे. वेगवेगळ्या देशातल्या ग्रॅनी आणि मुले वेगवेगळ्या ढगांमध्ये बसले आहेत आणि इंटरनेटच्या काल्पनिक जाळ्याने त्या सर्वांना जोडलेले आहे.

ढगात तरंगणाऱ्या आणि एकमेकांशी फक्त इंटरनेटच्या जाळ्यानेच नाही तर प्रेम आणि आपुलकीच्या धाग्यांनीही जोडल्या गेलेल्या या ग्रॅनी आणि मुले एकमेकांकडून सतत नवनवे शिकण्याचा जो आनंद घेत असतात तो त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतो आहे.

**मधुरा मणेर, प्रकाश अनभुले**

# प्रगत शिक्षण संस्था, फलटण
वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २०१४

संपादकीय सहाय्य
मंजिरी निंबकर
प्रकाश अनभुले
मधुरा मणेर

रेखाचित्रे
सोनाली काकडे ,अर्चित परुळेकर
अनिकेत झेंडे, ऋषिकेश निंबाळकर
ओंकार गायकवाड, जितेंद्र काकडे

मुखपृष्ठ
जितेंद्र काकडे

रेखाटन मार्गदर्शक
कल्पिता दंडवते

अनेक कथा व कवितांची चित्रे त्या त्या लेखक व कवींनी काढलेली आहेत.

**प्रकाशन:** प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३

**संगणकीय अक्षरजुळणी:** सौ. स्वाती उपळेकर, प्रकाश अनभुले, कमला निंबकर बालभवन

**फोन:** ०२१६६-२२३०४१

**email** : pragatshikshansanstha@gmail.com

**website** : www.pragatshikshansanstha.org

# अनुक्रमणिका

प्रस्तावना/मंजिरी निंबकर/vi

खिडकीतला संसार/ किरण घनवट, इ. ३ री/ १

खिडकीतून डोकावताना/रेणुका सस्ते, इ.३ री/ २

कालवड झाली/ ज्ञानेश्वरी भिसे, महेश भिसे, इ.२ री/ ३

माझी मांजर शाळेत गेली/ सोहम दोशी इ.४ थी/ ४

आजी वाचायला शिकते/ रूपल पाटोळे इ. ४ थी/ ५

सोनाळ्याच्या आठवणी/परीक्षित विशे, इ. ५ वी/ ६

लुशा हरवला/सिद्धी शिरोळकर, इ. ६ वी/ ७

पेरू/शरयू माने, इ. १ ली/ ८

आमच्या घरी साप निघाला तेव्हा. . ./स्वालिहा शेख, इ. ६ वी/ ९

माळावरची बोरं/ अमित कदम, इ. ४ थी/ १०

बंधुप्रेम/यश वाळा, इ. ६ वी, / ११

भूत/ रूपल पाटोळे, ४ थी/१२

आम्लेटची चतुर्थी/ वैष्णवी घनवट, इ. ५ वी/ १३

द्राक्षबाग/ सानिया सस्ते, इ. ६ वी/ १४

मेरा फिश टँक/ शुभम लुगडे, इ. ८ वी/ १६

सात घोडे/ चैतन्य राऊत, इ. ६ वी/ १७

माझ्या लाडक्या बकऱ्या/ स्नेहा काकडे, इ. ५ वी/ १९

मैं बडा होकर शिक्षक बनूँगा/ शुभम कुंभार, इ. ८ वी/ २१

धोक्याची घंटा/ ओंकार गायकवाड, इ. ८ वी/ २२

अवकाळी पाऊस/ वैभव बेलदार, इ. ८ वी/ २४

माणुसकी/ अक्षदा फणसे, ८ वी/ २६

सोमवती अमावस्या/ राहुल राऊत, इ. ८ वी/ २७

सभोवती/ रिया गोळे, ओजस निंबाळकर इ. १ ली/ २८

रविवारचा दिवस/ ऋतिक माने, इ. ८ वी/ २९

दुनिया पक्ष्यांची/ ऋषिकेश जाधव, इ.९ वी/ ३०

गावाकडचा तमाशा/ अभयसिंह सोनवलकर, इ. ५ वी/ ३२

Interesting Holidays/ Rohan Taware, 8th/ ३४

Beautiful Smile/Prajakta Mane, 7th, Mrunal Salunkhe, Madhura Ghanwat 6th / ३५

There is a Granny who Comes on Skype/Jioo Nimkar, Jitendra Kakade, Divya Bhosale, 6th / ३६

Our Young Granny/ Shivani Lalge, Sadhana Dhamal, 7th / ३७

# प्रस्तावना

फलटण हे फलटण तालुक्यातील एकमेव मोठे शहर. पण नवनीत वाचल्यावर लक्षात येते की बाजारपेठा, दुकाने, कॉलेजेस, दोन चाकी व चार चाकी वाहनांची संख्या वाढल्यामुळे त्याला शहर म्हटले तरी मुलांच्या मनात मात्र खेड्यातला, निसर्गाजवळ नेणारा निरागसपणाच आढळतो आहे. त्याचे प्रतिबिंब मुलांनी निवडलेल्या लेखन विषयात दिसतात.

तिसरीच्या वर्गात नेहेमी काहीतरी वेगळा विषय देऊन मुलांना लिहिते केले जाते. कधी 'पतंग' तर कधी 'मोठ्या माणसांशी वागावे तरी कसे' तर कधी 'आम्ही बैल कसा बनवला'. या वर्षी विषय दिला होता 'खिडकीतून बघताना'. त्याविषयी लिहिले आहे रेणुका आणि किरणने. ज्ञानेश्वरी व महेश या शेतावर राहणाऱ्या दोघा चुलत भावंडांनी आपापल्या घरी झालेल्या कालवडीच्या जन्माचे वर्णन केले आहे. अशाच आपल्या गावाकडच्या सुट्टीच्या वास्तव्यात आपण काय काय केले ते लिहिले आहे रोहनने.

सहावीतल्या यशने माणसाप्रमाणे कावळे सुद्धा एकमेकाची काळजी घेतात हे दाखवणारा अनुभव लिहिला आहे. सिद्धी आणि स्नेहाने आपल्या लाडक्या पाळीव प्राण्याच्या हरवण्याने होणारी घालमेल फार छान रंगवली आहे. ऋतिकने रविवारचा दिवस या आपल्या लेखातून 'गाढवांना पिंजरा नाही आणि घरही नाही.' असे एक मार्मिक विधान करून प्राण्यांविषयी आपली संवेदनशीलता व्यक्त केली आहे. तर आपल्या परिसरातील पक्षांचे निरीक्षण करून पक्षी जगताची मनोरंजक माहिती मिळवली आहे ऋषिकेशने. त्याने ती लिहिलीही आहे आपल्या गमतीदार शैलीत.

फलटणच्या दक्षिणेला असणाऱ्या द्राक्ष बागाईतीची माहिती सानियाने गोष्टीच्या रुपात मोठ्या मनोरंजकपणे मांडली आहे. निसर्गाची अवकृपा झाली तर सारी मेहनत कशी पाण्यात जाते हे लिहितानाच शेतकऱ्यांचा दुर्दम्य आशावाद ती शेवटच्या ओळीत दाखवते. निसर्गापुढे माणूस किती कस्पटासमान असतो ते मांडले आहे वैभवने अवकाळी पाऊस या अनुभवातून.

याशिवाय अनेक वेगवेगळे अनुभव मुलांनी मांडले आहेत. स्वालिहाने दारात निघालेल्या सापाबद्दल लिहिले आहे तर शुभम आपल्या फिश टँकच्या अनुभवाबद्दल लिहितो. वैष्णवीने लक्षात न राहून नाश्त्याला आम्लेट बनवल्यामुळे झालेल्या फजितीबद्दल लिहिले आहे. यातील अनेक अनुभवांमधून एका प्रेमळ, समजूतदार आणि सुजाण पालकत्वाची झलक दिसत राहते.

'आजी वाचायला शिकते' या रुपलच्या आणि 'सोनाळ्याच्या आठवणी' या परीक्षितच्या लेखांमधून आजी आणि नातवडांमधील प्रेमळ नाते नजरेस पडते. विनोदी अंगाने जाणारी ओंकारची 'धोक्याची घंटा' नक्कीच वाचणाऱ्याला आपल्या आयुष्यातील काही गोष्टींची आठवण करून देईल. शुभम आपल्या भविष्याचा विचार करून आपल्याला शिक्षक व्हायला आवडेल असे म्हणतो. राहुलची 'सोमवती अमावस्या' आणि अभयसिंहचा 'गावाकडचा तमाशा' हे लेख नवनीतचा ग्रामीण चेहरा जपतात.

'माझी मांजर शाळेत गेली' आणि 'सात घोडे' या पूर्ण काल्पनिक कथा लिहिल्या आहेत सोहम व चैतन्यने. पहिलीच्या रिया व ओजसने काय काय बघायला, ऐकायला माणसे जमा होतात ते लिहिले आहे तर शरयूने पेरू आणि अमितने बोरांवर छोट्या कविता केल्या आहेत. रुपलने आपल्या कल्पनेतल्या भुतावर कविता केली आहे तर अक्षदाने नाहिशा होत चाललेल्या माणुसकीवर.


इंग्रजी विभागात आपली लाडक्या ग्रॅनींबद्दल मुलांनी भरभरून लिहिले आहे. दुसऱ्या देशातल्या आजी–आजोबांबरोबर मुले गेले सहा महिने किती रमून गेली आहेत ते या लेखांवरून दिसते. बहुसंख्य चित्रे लेखकांनीच काढली असली तरी जितेंद्र, सोनाली, अनिकेत आणि अर्चितने आपल्या कुंचल्यातून अंक जिवंत केला आहे.

**मंजिरी निंबकर**

# खिडकीतला संसार

किरण घनवट
इ. ३ री

आम्ही आमच्या बेडरूमच्या खिडकीच्या बाहेर लसणाच्या पेंड्या अडकवल्या होत्या. तर तिथे एक सूर्यपक्ष्यासारखा दिसणारा पक्षी होता. त्याने त्या पेड्यांमध्ये एक घरटं तयार केलं. त्याला दोन दारं. आमच्या घराच्या ग्रिलमध्ये येऊन बसायचा व इकडे तिकडे पहायचा आणि भुर्रकन उडून जायचा. मग त्याला पिल्लं झाली. ती मोठी झाली की सगळे वेगळे झाले आणि ते घरटं खिडकीतून काढलं.



# खिडकीतून डोकावताना

रेणुका सस्ते
इ.३ री

एकदा खिडकीत बसले की उठावेसे वाटत नाही. सुंदर पक्षी ते ही निळ्या आकाशात किती छान दिसतात ना! खिडकीत बसल्यावर पक्षी बधितले की पक्ष्यांबरोबर उडावे वाटते.

फुलांचा सुगंध आणि गार वारा, पक्ष्यांचा आवाज मनावर पोचताना, पाऊस पडताना छान वाटते. खिडकीतून विजा चमकताना बघताना भीती वाटते. भिजलेल्या मातीचा सुगंध घेता येतो. असे वाटते रात्र न् दिवस खिडकीतच बसावे. खिडकीतून बघत बघत अभ्यास कधी संपतो ते कळत नाही. कधी रात्र झाली कळतच नाही. रात्र झाली की झोपावेच लागेल पण उदया शाळेतून आल्यावर आपण ही गंमत परत बघू ते खिडकीतूनच. ■



# कालवड झाली

**ज्ञानेश्वरी भिसे**


**इ. २ री**

काल आमच्या घरी सर आले होते. तेव्हा आमच्या गाईला कालवड झाली. आणि सर गेले माझ्या चुलत भावाकडे. तिथे पन त्यांच्या गाईला कालवड झाली. मग ती कशी झाली ते लिहिते. आमची गाय उठ बस उठ बस करत होती. मग ती खूप ओरडत होती. हंबा हंबा ओरडत होती. आमच्या पप्पांनी बघितलं तर गाईच्या पोटातून बाहेर आले होते पिलू. पप्पा त्या कालवडला वडत होते. तेव्हा माझ्या डोळयातून पाणी आले. मला खूप वाईट वाटले.

**महेश भिसे**

**इ. २ री**

काल चार वाजता आमच्या गाईला कालवड झाली. गाईच्या पोटातून दोन फुगे बाहेर येतात. एक फुगा रक्ताचा असतो. दुसरा फुगा कालवडीच्या पायाचा असतो. कालवडीच्या पायाचा फुगा फोडायचा तेव्हा त्या फुग्यातून कालवडीचे पाय बाहेर निघतात. मग कालवडीचे पाय ओढून काढले की ते वासरू बाहेर येते. मग गाईला सोडतात. गाय कालवडीला चाटते. मग गाईचं चाटून झाल्यावर कालवड चालायला लागते.



# माझी मांजर शाळेत गेली

**सोहम दोशी**
**इ.४ थी**

आमच्या घरात आम्ही एक मांजर पाळली आहे. तिचे नाव फरी आहे. ती खूप गुबगुबीत आहे. ती माझ्याबरोबर खेळते, जेवते. पण एके दिवशी तर यापेक्षाही वेगळे माझ्याबरोबर करू लागली. ते म्हणजे अभ्यास. मी शाळेतून घरी आलो. आम्हाला खूप सारा अभ्यास दिला होता. म्हणून जेवणानंतर लगेच अभ्यासाला बसलो. तर तिने माझ्या दप्तरातील एक कागद आणला आणि ती माझ्यासारखे लिहू लागली. नंतर माझ्यासारखे चित्र काढू लागली.

हे बघून मी आश्चर्यचकीतच झालो. मला काहीच समजेना. ती तर रोज माझ्याबरोबर खेळायची, जेवायची पण अभ्यास मात्र कधीही करायची नाही. म्हणून मी तिला विचारले की तू माझ्यासारखे का करत आहेस?

मग ती म्हणाली की मला पण तुझ्यासारखे शिकायचे आहे. नंतर मी तिला रोज काही ना काही शिकवू लागलो. कधी इंग्रजी, कधी मराठी, कधी गणित, कधी विज्ञान तर कधी इतिहास. मग तिला हळूहळू सर्व विषयातील ज्ञान आले. नंतर काही दिवसांनी ती माझ्याबरोबर शाळेत येऊ लागली. तेवढयात आईने हाक मारली, ''उठ सोहम, उठ. शाळेत जायचे आहे ना?'' लगेच मी दचकून उठलो. आणि बघतो तर काय माझी मांजर तर माझ्याजवळ डाराडूर झोपली होती. मग मला समजले की हे तर स्वप्न होते. मुलांनो, असे जर खरोखरी घडले तर?



# आजी वाचायला शिकते

रूपल पाटोळे
इ. ४ थी

माझी आजी प्रेमळ आहे. ती अशिक्षित आहे. रामदासस्वामींच्या बैठकीत ती जाते. तिथे तिला लिहायला वाचायला शिकवतात. आता तिला मोठया अक्षरांची पुस्तके वाचायला येतात. ती कधी काना, मात्रा, उकार, वेलांटी गाळते, तर कधी शब्दच गाळते.

पण आता ती बऱ्यापैकी वाचते. तिला वाचनाची आवड आहे. पण गावाकडे तिला वाचायला वेळच मिळत नाही. फलटणला आल्यावर मी तिला वाचायला लावते. मी तिच्यासमोर गोष्टींची छान–छान पुस्तके ठेवून रोज एक– एक गोष्ट तिच्याकडून वाचून घेते. मग ती गावाला जाऊन क्षितिज आणि अथर्व या तिच्या नातवांना त्या गोष्टी सांगते. त्यामुळे आजीकडे मुले रोज गोष्टीसाठी हट्ट करतात. आजी आपल्या गोष्टींच्या खजिन्यातून रोज एक नवीन गोष्ट मुलांना सांगते.

आता परीक्षेनंतर उन्हाळयाची सुट्टी लागेल, मग मीच आजीकडे जाणार आहे. शाळेत आलेल्या पुस्तक प्रदर्शनातून मी खूप पुस्तके विकत घेतली आहेत. तेव्हा आता या सुट्टीत येणार खूप खूप मजा! ■



# सोनाळ्याच्या आठवणी

**परीक्षित विशे**
**इ. ५ वी**

मी मागच्या वर्षी सातारा जिल्हयात फलटण या गावी शिकायला आलो. आता मी पाचवीत आहे.

जेव्हा माझे पेपर सुरू असतात तेव्हा मला असे वाटते की मी कधी एकदाचा माझ्या गावी आजीला भेटायला जातो.

माझी आजी ठाणे जिल्हयात सोनाळा या गावी राहते. ती माझे खूप लाड करते. जेव्हा आई बाहेर गावी कामाला जाते तेव्हा आजी मला पाच सहा रूपये खाऊ खायला देते. आणि माझ्या छोटया भावालाही ती खूप सांभाळते. मी जेव्हा सुट्टीला परत गावी येतो तेव्हा ती माझ्यासाठी काही ना काही जपून ठेवते.



माझी आजी सकाळी लवकर उठून देवपूजा करते व बाहेर तुळशीजवळ अगरबत्ती लावते.

आम्हाला एक छोटेसे शेत आहे. त्यात आम्ही तांदूळ, हरभरा, वाल अशी कडधान्ये लावतो. आमचे तांदूळ लावून झाल्यावर आम्ही ते काढून, वाळवून घरी आणतो. त्याच्यात आजीचा खूप हातभार असतो. नंतर आम्ही हरभरा व वाल लावतो. हरभरा उगवल्यावर त्याच्यावर गावातल्यांचा खूप डोळा असतो.

जेव्हा गावातली पाच सहा पोरं हरभरा चोरायला जातात तेव्हा पहिल्यांदा ठरवूनच जातात की हा माणूस किती खडूस आहे, किती कंजूस आहे. त्याच्या शेतातला हरभरा चोरायलाच पाहिजे. असाच गावातला न बोलणारा, न रागावणारा माणूस असेल तर त्याच्याही शेतातला हरभरा मुद्दामहून चोरतात. गावातल्या माणसांनाही माहीत असते की हेच हरभरा चोरतात पण ते काहीच करू शकत नाहीत.

कधी कधी आमच्याही शेतातला हरभरा मुले चोरतात पण माझीही आजी त्यांना काहीच करू शकत नाही.

■


# लुशा हरवला

सिद्धी शिरोळकर
इ. ६ वी

फलटणपासून २ कि.मी. अंतरावर कुरवलीच्या अगदी जवळ जोरगाव हे गाव आहे. रस्ता जाण्यासारखा मोकळा आहे. त्या गावात महाबळेश्वरातील काही लोक वसलेली आहेत. त्याच गावात आमची डाळिंबाची शेती आहे. आमच्या शेताशेजारी मेंढऱ्या चरायला येतात. आमची कुत्री त्यांना भुंकून पळवून लावतात.

दोन वर्ष पूर्ण होण्याआधीच इतर कुत्र्यांनी मारून टाकलं. तो शेतात पडल्यामुळे आम्हाला संध्याकाळी कळलं. मला मनापासून वाईट वाटलं.

लुशा मात्र वाळक्या काठीसारखा आहे. रानात हिंडण्यात माहीर आहे. सगळयांच्या मागे उडया मारत येतो. मात्र कुणी परकं आलं की भुंकतो तर कधी त्यांच्या मागे पळतो. ते



आमचं कुत्रं लुशा. त्याचबरोबर पांडा हे कुत्रं पण होतं. लहान असताना पांडा गुबगुबीत होता. दूधवाल्या दिदीच्या मागे-मागे आला. तसंच आम्ही त्याला पाळलं. नुकतंच त्याला

पहायला खूप मजा येते. तो आता अंगानी वाढलाय.

मला लहान असताना कुत्री फार आवडायची पण एक वेळ अशी आली की

मी कुत्र्यांना भिऊ लागले. माझ्या आजोबांना कुत्रं चावल्यापासून मनात जे दडपण बसलं ते आत्तापर्यंत तसंच होतं. पण लुशा आल्यापासून माझी भीती दूर झाली.


सुट्टीच्या दिवशी मी आणि माझा भाऊ आईसोबत शेतात आलो. पण तो दिवस वेगळाच होता. लुशा आमच्या मागे रोज पळत येतो, त्या दिवशी आलाच नाही. मला वाटलं इकडं तिकडं असेल. मग आम्ही शेतात फिरायला गेलो. तिथंही लुशा नाही. लुशा..... लुशा...... लुशा अशा हाकाही मारल्या. पण लुशाचं उत्तर नाही. आईनी पण हाका मारल्या. एक तास झाला, दोन तास झाले, तीन तास झाले. लुशा आलाच नाही. त्याची पोळी तशीच राहिली.

संध्याकाळ झाली. माझे बाबा आले. पाच वाजले. त्यांनी शेतात फेरफटका मारला. बाबांनी पण लुशाबद्दल विचारले. शेतातल्या मोटारी बंद केल्या. आवरून सावरून आम्ही फलटणला परतणार होतो.

तेवढयात माझ्या कानावर भू-भू आवाज आला. मागे बघते तर काय? लुशा पळत आला. थोडा धुरकटलेला होता. मनात असं वाटत होतं खूप प्रश्न विचारावे. आम्हाला सगळयांना खूप आनंद झाला. लुशा भुंकत माझ्याजवळ आला. त्यावेळेस मला डॉक्टर डूलिट्ल यांच्या गोष्टीची आठवण झाली. डॉक्टर डूलिट्ल यांच्यासारखी मला जनावरांची भाषा समजत असती तर मला लुशाची गोष्ट कळली असती. गोष्ट नाही तर नाही, लुशा परत आला याचा मला खूप आनंद झाला. ■

## पेरू

ताजा ताजा पेरू
आवडतो मला खूप
माझ्यासाठी माझे डॅडी
आणतात पेरू
पेरू कापून
लावतात तिखट मीठ
मी संपवते गप्पा मारत




**शरयू माने, इ. १ ली**

# आमच्या घरी साप निघाला तेव्हा. . .

स्वालिहा शेख
इ. ६ वी

उन्हाळयाच्या सुट्टया लागल्या होत्या व मी गावाला गेले नव्हते. माझा दादा मुंबईला मल्लखांबसाठी गेला होता. दादाला मुंबईला जाऊन दोन दिवस झाले होते. आम्ही दादा आल्यावर गावाला जाणार होतो. पप्पा ४० दिवसांसाठी फलटण ते मुंबईला जमातसाठी गेले होते. उन्हाळा सुरू झाला होता. ऊन खूप रखरखीत होते. घराच्या बाहेर निघायला नको असे वाटत होते.

त्याच दिवशी किचनमध्ये स्वयंपाक करत असताना दार उघडे असल्यामुळे एक सापसुरळी आत आली. मी तिला मागच्या दारातून बाहेर काढत असताना ती बाहेर निघायला घाबरत होती. आम्ही तिला कसेबसे बाहेर काढले. ती पायऱ्यांवरच होती तेव्हाच आमच्या पायऱ्यांसमोरच्या चेंबरातून एका भल्या मोठ्या, काळे ठिपके असलेल्या पिवळ्या धमक सापाने त्या सापसुरळीला खाण्यासाठी झेप घेतली. हे आईने पण पाहिले. आम्ही जोरात किंचाळलो. आमच्या आवाजाने साप चेंबरमध्ये गेला व सापसुरळी पळून गेली. आमचे शेजारी घाबरून बाहेर आले. आम्ही पटकन किचनचे दार लावले. आमच्या शेजारच्यांनी विचारले, ''काय झाले?'' आम्ही त्यांना हकिकत सांगितली. आम्ही त्यांच्या घराच्या अंगणातून पाहिले तर



काय? लांबच लांब साप शेजारच्या तेजस दादाच्या घराकडे सळसळत गेला. हे सगळे बांधकामावरच्या एका इंजिनिअरने पाहिले व त्याने अपार्टमेंटच्या गच्चीवरून ओरडून सांगितले की तुम्ही आमच्याकडून थोडे सिमेंट घेऊन चेंबर भरून टाका. मी सायकलवर जाऊन सिमेंट आणले. त्यांनी मला पाणी मागितले. मी त्यांना फ्रिजमधले पाणी दिले. तर ते खूपच खूष झाले.

माझा भाऊ व पप्पा नसल्यामुळे हे काम आम्हाला करावे लागले. आम्ही खूप घाबरलो होतो तेव्हा सायलीच्या आईने आम्हाला धीर दिला. आम्ही चेंबर भरल्यानंतर एकदाचा श्वास सोडला.

आम्ही जेवून एकदाचे हे सगळे विसरून गेलो. नंतर पप्पांना व दादाला ही हकिकत सांगितली.

■

---


## माळावरची बोरं

माळावरची बोरं
पाडाय निघाली पोरं
बोरं लागल्यात गोड गोड
मुलं म्हणती आता,
कुणाची काडायची खोड?
खोड काडल्यावर,
मुलं लागली ओरडायला
शेजारच्या काकू,
लगेच येती मारायला.

**अमित कदम**
**इ. ४ थी**

# बंधुप्रेम

यश वाळा
इ. ६ वी



हिवाळयाचे दिवस होते. मी व माझा मित्र गोटया खेळत होतो. दिवस लहान होते. तेवढयात तिन्हीसांज झाली. आईने मला बोलाविले, "चल रे बाळा तिन्हीसांज झाली" मी घरात यायला निघालो. शेजारी लाइटच्या तारेवर एक कावळा ऐटीत बसला होता. त्याचा दुसरा पाय दुसऱ्या तारेला लागताच माझे लक्ष त्या तारेकडे गेले. त्याला जोरात शॉक बसला. तो जोराचा जमिनीवर आदळला. मी धावत त्याच्याकडे गेलो. मी तिथे जाऊन उभा राहिलो. मग त्याला उचलले व अंगणात आणले. धावत घरात जाऊन वाटीभर बाजरी आणली व पेलाभर पाणी आणले. त्याच्या चोचीत ओतले. पण तो कावळा मेलाच.


तेवढयात आईने परत एकदा हाक मारली. मी ती न ऐकल्यासारखी केली. मागे वळून बघतो तर काय? उंबराच्या झाडावर कावळे येऊन बसले होते. सर्वजण काव काव करू

लागले. त्यातला एक कावळा अंगणात माझ्या मागे येऊन बसला कारण वाटीत बाजरी होती. मला वाटले बाजरी बघून आले.म्हणून मी हुर्र करून उडवून लावले. तरीही त्यातला एक कावळा आला आणि मेलेल्या कावळ्याला चोच्या मारू लागला. मी त्या कावळयाला उचलले व घरात ठेवले. मी बाहेर बाजरी व पाणी घेण्यासाठी आलो तर सर्व कावळे माझ्या मागे लागले. मी धावत घरात आलो आणि दरवाजा लावून टाकला. मला असे वाटू लागले मी [illegible] कशाला उचलले. मला पश्चात्ताप झाला. तेवढयात आई म्हणाली, "दार कुणी लावले? तिन्हीसांजेला दार लावू नये." मी दार उघडले आणि कावळयाला घेऊन बाहेर गेलो व खड्डा खणू लागलो. खड्डा खणून झाला. मी त्याला खड्डयात पुरले. घरात आलो व हात-पाय धुतले.

मी विचार करीत बसलो. का आले होते ते कावळे? त्यांना कसे कळले की त्यांच्या एका बंधूला काहीतरी झाले आहे? आपण म्हणतो माणसालाच कळते म्हणून पण त्या प्रसंगावरून मला कळले की पशु-पक्षीही आपल्या बांधवांची काळजी घेतात.

---

## भूत



सगळे म्हणतात भूत नसते
पण काही म्हणतात ते अंधारात दिसते
डोळे त्याचे काळे का लाल
लाल डोळे ही तर झाली कमाल
उजेडाला भिते
डोंगराच्या मागे लपून बसते
काही म्हणतात,
भुताच्या घरातील भांडी स्वतः चालतात.

**रूपल पाटोळे, इ. ४ थी**

# आम्लेटची चतुर्थी

**वैष्णवी घनवट**
**इ. ५ वी**

आता मी तुम्हाला एक गंमत सांगणार आहे. झालं असं की चतुर्थी होती. मला व माझ्या भावाला भूक लागली होती. मम्मी व पप्पा बाजाराला गेले होते. आजी– आजोबा शेतात गेले होते. घरी खायला काहीच नव्हतं.

मला माहीत नव्हतं की चतुर्थी आहे. मी सरळ आम्लेट केलं आणि खाल्लं. नंतर आळस आला. चहा केला, पिला. अंडयाचा वास सुटला. मग माझ्या लक्षात आलं की चतुर्थी आहे. मग मम्मी व पप्पा घरी आले. मला वाटलं मम्मी रागवणार पण मम्मीने शाबासकी दिली. भुकेपोटी काहीतरी करुन खाल्ले म्हणून मला खूप आनंद झाला, आता मी अधूनमधून मुद्दाम आम्लेट करते. माझे आम्लेट सर्वांना आवडते ! ■



# द्राक्षबाग

सानिया सस्ते

इ. ६ वी

सकाळी सकाळी कानावर हाक पडली. डोळे उघडून पाहते तर काय? आई व बाबा दोघेही शेतात निघाले होते. द्राक्षांची छाटणी चालू होती ना! नेमकी आमच्या परीक्षेच्या दिवसातच द्राक्षांची छाटणी चालू असते. त्यामुळे मला शेतातही जाता येत नाही. बरं बाबांना म्हणावं माझी परीक्षा झाल्यावर छाटणी करा तर तेही चालत नाही. कारण द्राक्षांची कामं वेळच्या वेळी करणं भागच असतं. आमच्या गावातील बहुतेक लोक शेतीच करतात व शेतात द्राक्षे पिकतात. कोणाकडे काळी, कोणाकडे हिरवी, द्राक्षेच द्राक्षे!

द्राक्षे हे पीक वेलवर्गीय असल्यामुळे त्याला मांडव करणे गरजेचेच असते. मांडव करताना तर मज्जा येते. तारा लावताना आम्ही मुले फारच मज्जा करतो. जेव्हा द्राक्षांना पाने येऊ लागतात तेव्हा ती पूर्णपणे तारेवर असतात. द्राक्षे आल्यावर ती खाली लोंबकळू नयेत म्हणून त्याला सुतळीने बांधतात.

त्या दिवशी नेमकी आम्हाला सुट्टी होती. शेतामध्ये सुतळयांनी फांदया वरती बांधण्याचे काम चालू होते. मी शेतात गेले आणि सुतळी घेऊन एक फांदी वर बांधण्याचा प्रयत्न करू लागले. माझा वरच्या फांदीपर्यंत हातच पोचत नव्हता. मी स्टूलवर उभं राहून बांधण्याचा प्रयत्न करत होते, पण कसलं काय! मला स्टूलवर उभं राहून फांदी वरती बांधताच येईना. खरंच कोणतंही काम सोपं नसतं. त्यासाठी कष्ट व मेहनत करावीच लागते. तुम्हाला हा प्रश्न पडला असेल ना की जर द्राक्षे यायच्या आधीच एवढी मज्जा तर द्राक्षे आल्यावर केवढी मज्जा येत असेल?

जेव्हा वेलींना छोटी–छोटी द्राक्षे येऊ लागतात तेव्हा शेतात निरनिराळे पक्षी हजर होतात. जेव्हा द्राक्षे येऊ लागतात तेव्हा आम्ही शेतात एक मचाण बांधतो. त्यावरती जाऊन बसलं की सगळीकडे हिरवं, हिरवं. मचाणावर बसण्यासाठी एक पोतं टाकलेलं असतं. असेच द्राक्षे काढणीच्या वेळेला मी शेतात गेले. आम्हा मुलांपैकी कोणीही शेतात गेलं की पहिल्यांदा मचाणावर जाऊन बसतं. मीही भराभर पायऱ्या चढून मचाणावर गेले. बसण्यासाठी स्टूलही होता. शेजारीच पत्र्याचा डबाही होता. त्यावर एक काठी. त्या काठीने डबा वाजवून पक्षी उडविण्याची मजा काही औरच. अरे हो, एक सांगायचंच राहिलं. आमची द्राक्षे निर्यात होतात. त्यामुळे द्राक्षे निर्यातक्षम बनविण्यासाठी माझे बाबा व गावातील इतर शेतकरीही फार कष्ट घेतात.

माझी सत्र परीक्षा संपली. आता सुट्टया


लागणार होत्या व आमची द्राक्षे सुरू होणार होती. नोव्हेंबर महिना म्हणजे फारच धामधुमीचा, धावपळीचा. याच काळात द्राक्षे निर्यात करण्यासाठी तयार होतात. आता थोडयाच दिवसात द्राक्षे चालू होणार होती. द्राक्षे जेव्हा आंबट असतात तेव्हा मोठे लोक सतत सांगत असतात, द्राक्षे खाऊ नका, आजारी पडाल. पण मोठयांचा डोळा चुकवून द्राक्षे खाताना फारच गंमत वाटते.

सकाळी सकाळी मी लवकर उठले. आज शेतात जायचे होते. माझे आवरून सायकलवरून लगेचच शेतात पोहोचले. शेतात माझे वडील इतर मजुरांबरोबर द्राक्षे तोडत होते. द्राक्षे तोडणी सुरू झाली की सकाळी लवकर सुरू करावी लागते. सर्व पाहुणे मंडळींना बोलवून त्यांनाही शेतात काम करावे लागते. एव्हाना पाहुणे व घरचे लोक जमले होते. काका, काकी, आत्याची मुले, आईचे वडील व आई असे बरेचसे लोक उपस्थिती दर्शवीत होते.

द्राक्षाच्या बागेत छोटया मुलांपासून अगदी मोठयांपर्यंत सर्वांनाच काम पुरून उरतं. द्राक्षांच्या पेटयांवरती नंबर टाकणे, ग्रेप गार्ड कागदामध्ये गुंडाळणे ही कामे मला फार आवडतात.

द्राक्षाची बाग म्हणजे जेवढे सुख तेवढे दु:खही. आमची द्राक्षे ऐन पावसाळयात असतात. त्यामुळे जर पाऊस पडला तर हातचे सर्व पीक जाते. पदरी पडते ती फक्त निराशाच. एकदा असेच द्राक्ष पीक दोन दिवसांनी काढणीसाठी तयार होणार होते. पण आदल्याच दिवशी धो धो पाऊस. सर्व पीक मातीमध्ये नाहीसे झाले. वर्षभराची मेहनत पूर्णपणे वाया गेली. म्हणूनच द्राक्षाची शेती ज्याप्रमाणे जास्त पैसा मिळवून देते त्याचप्रमाणे पदरी निराशाही पाडते. परंतु निरगुडीतील शेतकऱ्यांना कष्टाचे फळ कधी ना कधी मिळतेच.

■



# मेरा फिश टँक

**शुभम लुगडे**
**इ. ८ वी**

मुझे मछलियाँ बहुत अच्छी लगती हैं। खाने के लिए भी और पालने के लिए भी। एक दिन मैंने माँ और पिताजी से कहा कि मुझे फिश टँक और उसमें मछलियाँ चाहिए। माँ ने कहा, उसकी देखभाल तुम्हें ही करनी पडेगी। अगर मंजूर है, तो ही फिश टँक लाना। पिताजी ने तो १५–२० दिनों तक अनसुना ही किया। लेकिन मैं भी पिछा छोडने वालों में से नहीं था। मैंने फिर बात छेडी, "पापा हम फिश टँक कब ला रहे हैं?" पिताजी ने सुना और कहा, "बाद में देखेंगे।" लेकिन मैंने अपना फैसला सुना दिया– "दिवाली की छुटिट्याँ हैं, मैं घर में ही फिश टँक बनाऊँगा।"

मैंने अपने गुल्लक से पैसे निकाले और सामान लेकर आया। फिर तो पिताजी भी मदद करने लगे। हमने फिश टँक बनाया। एक मछली एक्सपर्ट को बुलाया। उससे सारी देखभाल की जानकारी ली। आठ गोल्ड फिश और दो काली शार्क मछलियाँ लाई। धीरे धीरे मेरी और उनकी दोस्ती हो गई। इतनी कि यदि मैं फिश टँक के बाहर से घूमता तो वो भी गोल घूमती थी।

एक दिन मैं मछलियों को खाना डाल रहा था। मुझे केशरी मछली दिखी नहीं। मैंने गिनना शुरू किया। एक, दो....आठ, नौ! फिर तो मैंने घर में हंगामा खडा कर दिया। माँ ने भी गिनी तो नौ ही थी। माँ का ध्यान जमीन पर गया तो वहाँ मेरी प्रिय मछली मरी पडी थी। मुझे बहुत दुख हुआ। बाद में समझा कि जब मैंने खाना डालने के लिए शटर पीछे किया तो वह कूद कर नीचे गिरी। मैंने उसे उठाया और उसपर से हाथ फेरा। फिर गड्ढा खोदकर उसमें उसे हमेशा के लिए रख दिया। कई दिनों तक मेरा उस गड्ढे की तरफ ध्यान जाता था। अब मैं फलटन में रहता हूँ। अब जब मैं अखबार में या न्यूज में कागल गाँव का नाम सुनता हूँ तो मुझे वह बडी गोल्ड फिश बरबस याद आती है।



# सात घोडे

**चैतन्य राऊत**
**इ. ६ वी**

एक गाव होते. त्याच्या एका बाजूला घनदाट जंगल होते. तर जंगलाच्या दुसऱ्या टोकाला राजा विक्रमाचा महाल होता. त्या गावात नारायण नावाचा शेतकरी रहात होता. त्याच्याकडे भरपूर जमीन होती. त्याला रामू, शामू आणि दामू नावाची तीन मुले होती. ते तिघेही तरूण होते. पण काहीच काम करत नव्हते.

एके दिवशी नारायणने कंटाळून त्यांना सांगितले, "मी तुम्हाला एक महिन्याची मुदत देतो. तुम्ही काम करून पैसे मिळवले तरच मी माझ्या जमीनीतला त्याचा वाटा त्याला देईन." हे ऐकल्यावर तिघे घराबाहेर पडले. ते गावाशेजारच्या जंगलात गेले. जंगलातून चालत असताना मोठा भाऊ रामू गुपचुप झाडातून निघून गेला. चालता चालता त्याला वाटेत एक जखमी माणूस दिसला. तो रामूला म्हणाला, "अरे बाबा मला मदत कर." त्यावर रामू म्हणाला, "माझ्याकडे आता वेळ नाही, तू दुसऱ्या कोणालातरी विचार." एवढे बोलून रामू पुढे चालू लागला. थोडे अंतर गेल्यावर त्याला राजाचा महाल दिसला. तो त्या महालात गेला. महालात जात असतानाच शेजारच्या सुंदर तबेल्यात त्याला दिमाखात उभे असलेले सात घोडे दिसले. प्रत्येकाच्या डोक्यावर एक शिंग होते. तसे घोडे पाहून त्याला आश्चर्य वाटले. नंतर तो दरबारात गेला. समोरच त्याला सिंहासनावर विक्रम राजा दिसला. मग रामू विक्रम राजाला म्हणाला, "महाराज माझ्यासाठी काही काम आहे का?" त्यावर राजाने विचार केला आणि म्हणाला, "अं... हां एक काम आहे. ते बाहेर घोडे बघितलेस ना त्यांची देखभाल कर." मग राजू तबेल्यात गेला. त्याने घोडयांना खूप चारा दिला आणि निघून गेला. घोडयांनी तो चारा खाल्ला नाही. रामूने त्याच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. रामू रोज त्यांना चारा दयायचा व निघून जायचा, पण घोडे तो चारा खात नव्हते. असे रोज चालायचे.


एके दिवशी राजा घोडयांची पाहणी करायला आला. तर त्याला घोडे पहिल्यापेक्षा बारीक झालेले दिसले. तेव्हा राजा रामूवर खूप चिडला व शिपायांना रामूला बंदी बनवण्याचा आदेश दिला. त्यांनी त्याला कारागृहात ठेवले.

शामूसोबतही रामूसारखीच घटना घडली. त्यानेही त्या जखमी माणसाला मदत नाकारली व तसाच पुढे निघून गेला. थोडेच अंतर गेल्यावर त्याला विक्रम राजाचा महाल दिसला. तो त्या महालात गेला व विक्रम राजाला भेटून काम देण्याची विनंती केली.

राजाने त्याला सात घोडयांची देखभाल करण्याचे काम दिले. तोही रामूप्रमाणेच घोडयांची देखभाल करू लागला. त्यामुळे घोडयांची स्थिती अजूनच खालावली. राजाला हे कळताच शामूला रामूसोबतच कारागृहात ठेवले.

दामूलाही तोच जखमी माणूस दिसला. दामूने त्याला मदत केली. तो माणूस एक जादूगार होता. जादूगाराने त्याला एक अंगठी दिली व सांगितले, ''तुला जेव्हा माझी मदत लागेल तेव्हा तू ही अंगठी घास. मी तुझ्या मदतीला येईन.'' एवढे बोलून तो जादूगार अदृश्य झाला. दामू पुढे चालू लागला. थोडया वेळाने त्याला विक्रम राजाचा महाल दिसला. दामूने आत गेल्यावर राजाकडे कामाची मागणी केली. राजाने त्यालाही घोडे सांभाळायचे काम दिले. घोडे काय खातात व त्यांना काय काय दयायचे हे त्याला माहीत नव्हते. म्हणून त्याने अंगठी घासली. तेव्हा तो जादूगार प्रकट झाला. जादूगार एवढया लवकर प्रकटल्याने त्याला अचंबा वाटला. मग त्याने जादुगाराला विचारले, ''हे घोडे काय खातात?'' त्यावर तो जादूगार म्हणाला, ''हे घोडे नाहीत तर विक्रम राजाचीच सात मुले आहेत. एका चेटकिणीने त्यांना शाप देऊन घोडे बनविले आहे. त्यांना पुरीभाजी, लाडू व दूध लागते. आणि जर तुला त्या घोडयांना परत राजकुमार बनवायचे असेल तर जंगलाच्या मध्यभागी असलेल्या झोपडीत ती चेटकीण राहते. त्या झोपडीत एक तलवार आहे. त्याने तू तिला मार.'' एवढे बोलून जादूगार गायब झाला.

**पान २० वर.**




# माझ्या लाडक्या बकऱ्या

स्नेहा काकडे
इ. ५ वी

आमच्याकडे एकूण ५ बकऱ्या आहेत. त्यामध्ये एक बकरी आहे ती माझी खूप लाडकी आहे. तिच्या पोटावर एक काळा डाग आहे. ती खूप सुंदर दिसते. म्हणून मी तिचे नाव सुंदरी ठेवले आहे.

सुंदरीला आता बाळ होणार होते. या ५ बकऱ्या एकटयाच चरायला जायच्या व एकटयाच परत यायच्या. सुंदरीला बाळ होणार होते म्हणून माझी आई तिला भुस्सा व कणीक चारायची. एके दिवशी या सगळ्या चरायला गेल्या. पण एक बकरी आलीच नाही. ती होती माझी सर्वात लाडकी बकरी. मग मी आईला सांगितले की सुंदरी घरी आली नाही. मग आई म्हणाली, "येईल गं, नको काळजी करू. तिला आपल्या घराचा रस्ता माहीत आहे ना." आम्ही सर्वांनी खूप वाट पाहिली पण ती काही घरी आलीच नाही. मी म्हणाले, "आई आपल्या सर्वांना तिला शोधायला जायला हवं कारण तिला बाळ होणार आहे. आपल्या सर्वांना तिची काळजी घ्यायला हवी." मग मी, आई, मावशी, काकी व दादा आम्ही सर्वजण तिला शोधायला गेलो. सगळीकडे शोधले. परंतु ती कुठेही सापडली नाही. मग आम्ही म्हणालो या बकऱ्या जिथे चरायला जातात तिथे जाऊन बघावं.



मग आम्ही रानामध्ये शोधायला गेलो. बघतो तर काय? तिला बाळ झाल होतं आणि आमची बकरी वेडपटाच्या गर्दाडीत अडकली होती. मग आम्ही तिला कसेबसे बाहेर काढले आणि तिला व तिच्या पिल्लाला घेऊन घरी आलो. आल्या आल्या मी तिला चारा दिला. मग मला एक प्रश्न पडला की या पिल्लाचे नाव काय ठेवायचे? आई म्हणाली आपण या पिल्लाचे नाव हिरा ठेवूया. दादा म्हणाला हे नाव खूप छान वाटते. मी रोज त्या पिल्लाला हिरा म्हणते म्हणून त्या पिल्लाला या नावाची सवय झाली आहे. मी हिरा म्हणले की ते माझ्याकडे पळत येते. ते पिल्लूसुदधा खूप छान दिसते. त्याच्या अंगावर काळे–काळे डाग आहेत.

अगोदर जे घडले होते तेव्हापासून मी शाळेतून घरी आल्यावर या ५ बकऱ्यांना व त्या पिल्लाला घेऊन रानात चरायला जाते. त्यांच्यावर बारकाईने लक्ष देते. त्यांना सुखरूप घरी आणते. रात्री बकरीच्या पिल्लाबरोबर व बकऱ्यांबरोबर खेळते. अशा या माझ्या लाडक्या बकऱ्या.

■

---

सात घोडे पान १८ वरून

दामू दररोज घोडयांना पुरी भाजी, लाडू व दूध दयायचा. एके दिवशी तो त्यांना घेऊन जंगलात गेला. तिथे त्याला एक झोपडी दिसली. ती झोपडी चेटकिणीची होती. तो हळूच त्या झोपडीत गेला. ती चेटकीण एका कोपऱ्यात बसून काहीतरी करत होती. दामूने दुसऱ्या कोपऱ्यात ठेवलेल्या तलवारीने त्या चेटकिणीला मारले. नंतर बाहेर कोणाचे तरी आवाज यायला लागले. म्हणून दामूने बाहेर येऊन पाहिले तर ते घोडे एकमेकांशी बोलत होते. तेव्हा दामूने त्यांना विचारले, "तुम्ही बोलत आहात पण तुमच्या खऱ्या रूपात का नाही आलात?" त्यातला एक घोडा म्हणाला, "जोपर्यंत तू आमच्या डोक्यावरची शिंगे कापत नाहीस तोपर्यंत आम्ही परत राजकुमार होऊ शकत नाही." मग दामूने त्या घोडयांची शिंगे कापली.

त्या घोडयांचे सुंदर, तरूण राजकुमारांत रूपांतर झाले. दामूला खूप आश्चर्य वाटले आणि खूप आनंदही झाला. दामू त्या राजकुमारांना घेऊन महालात गेला. राजकुमारांना बघून राजा विक्रमाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्याने दामूला खूप संपत्ती दिली. नंतर दामूने राजाकडे विनंती केली की माझे दोन भाऊ इथे कारागृहात आहेत. त्यांना सोडवा. मग राजाने रामू व शामूला सोडले. ते तिघे घरी गेले. मग तिन्ही मुलांनी सर्व हकिकत नारायणला सांगितली. मग नारायणने त्यांना सर्व जमीन दिली. सगळे सुखाने राहू लागले.

■

# मैं बडा होकर शिक्षक बनूँगा

शुभम कुंभार
इ. ८ वी

मैं जब सातवी में था तब तक मुझे समझ ही नही आता था कि मैं बडा होकर क्या बनूँ। लेकिन अब मैं बडा होकर शिक्षक ही बनूँगा, वह भी हिंदी का क्योंकि हिंदी भाषा मुझे अच्छी लगने लगी है।

आजकल मैं हिंदी विषय की ज्यादा किताबें ग्रंथालय में पढता हूँ। मैं मेरे स्वाध्याय, होमवर्क समय पर पूरे करता हूँ।

जब ताई मुझे पढ़ाती हैं, तब मुझे बडा मजा आता है क्योंकि वह मुझे प्रोत्साहन देती हैं। हमेशा कहती हैं, "शुभम, वाचनालय में किताबें पढ़ो।" पढ़ी हुई किताब पर चर्चा करती हैं। जब मैं कुछ बताता हूँ तो वह हमेशा एक वाक्य कहती हैं, "क्या बात है शुभम! बहुत सुंदर तरीके से उत्तर दिया है।" तब मुझे प्रसन्नता होती है। मेरा मन उडने को कहता है।

कक्षा में वर्गकार्य जल्दी होता है, तब मुझे अन्य सहपाठियों को काम में मदद करनी होती है। तब मुझे बहुत गर्व लगता है। मैं बच्चों के पास जाता हूँ, चष्मा निकालकर पूछता हूँ और उनकी कापी का काम देखता हूँ।

मुझे मेरे वाचन पर ध्यान देना है। शब्द भंडार बढ़ाना है। मैं कॉलेज पूरा करके शिक्षक बनूँगा।

जब लोग शिक्षक बनते हैं, तब पता चलता है कि शिक्षक बनने के लिए क्या क्या करना पडता है। कितनी मेहनत लेनी पडती है।

इसलिए अब से सदैव प्रयत्न करूँगा कि मैं बडा होकर शिक्षक बनूँगा। ■



# धोक्याची घंटा

**ओंकार गायकवाड**
**इ. ८ वी**

तारीख २० फेब्रुवारी २०१४. वार गुरूवार. आमच्यासाठी धडाकेबाज दिवस. माझ्या मामाच्या घरी पिराच्या देवाची कंदूरी ठरली होती. कार्यक्रम देवळातच होता. निघायची तयारी झाली. 'चलायचं का?' मी आईला विचारले. 'चल,' आईने प्रत्युत्तर दिले. जायच्या आधी सकाळी मी सायकलवरून दळण घेऊन येत असताना एका दगडामुळे अचानक सायकलवरून माझा ताबा सुटला. सायकल जमिनीवर विमानाप्रमाणे, एवढीच की फक्त आडवी लँड करणार, त्याच्या आत मी तिला पकडले. मागे वळून पाहिले तर दळणाचीही तीच स्थिती. दळण जमिनीवर आदळता आदळता राहिले तेव्हा कुठे माझा जीव भांडयात पडला. पण या घटनेमुळे मला नकळत त्या धोक्याच्या दिवसाची शंका आली.

घरून निघून आम्ही रिक्षास्टॉपवर आलो. 'काका, स्टँडवर चला,' मी उद्‌गारलो. मग वेटलिफ्टिंग करताना डंबेल उचलल्याप्रमाणे काकांनी रिक्षाची किक ताकद लावून ओढली. मग रिक्षा सुरू. आम्ही नाना पाटील चौकात पोहोचलो. स्टँडकडे वळवण्यासाठी काकांनी डावीकडे हँडेल वळवला. पुन्हा एक दगड. तीच परिस्थिती. रिक्षा कलंडली पण पडता पडता वाचली. सकाळच्या प्रसंगाची झलक माझ्या डोळयापुढे आली. या घटनेने तर माझ्या तोंडचे पाणीच पळाले होते.


मामाकडे पोहोचल्यावर कार्यक्रमाला सुरूवात झाली. बोकड कापले. त्याचे पनीर प्रमाणे बारीक तुकडे केले. तरी ते थोडे थोडे हलत होते. म्हणजे प्राण अजून शिल्लक होता. रगरगत्या सूर्याच्या दुपारी, निळयाभोर आकाशाखाली कडक उन्हात आम्ही विटांनी चूल बनवली. एखादया ओव्हनमध्ये शिजत असल्यासारखे तेथे वाटत होते. तेवढ्यात पुन्हा एका दगडामुळे आईला ठेच लागली. पाय बघायच्या नादात साडीचा पदर लालबुंद विस्तवावर केव्हा पडला कळलेच नाही. मग ते विझवून आई घरी जाऊन साडी बदलून आली. या घटनेने तर मला खात्रीच पटली होती की आज आपली घंटा टं ऽ ऽ ऽ ग.

या प्रकारानंतर माझे काळीज जोराने धडधडू लागले. कार्यक्रम झाला. जेवण झाले. मग मी व माझे मामा उरलेले प्यायच्या पाण्याचे कॅन घेऊन पिराच्या मंदिरातून घरी निघालो. गावठी रस्ते म्हणजे रेल्वेतून प्रवास केल्यासारखे. तिथेही कमीच असेल इतके जास्त येथे धडाधडा होत होते. पुन्हा एक दगड मध्ये आला. गाडी वर–खाली झाली. त्यामुळे

कॅनमधील काही पाणी माझ्या डोक्यावर सांडले. मी गडबडलो.

कार्यक्रम आटोपला. तसा तो दिवसही गेला. रात्री कशीबशी मला झोप लागली पण तो दिवस माझ्या मेंदूत नक्कीच कोठेतरी जीवनभर राहील. तुम्हीही डोक्याला जरा ताण दया. तुमचाही असा एक दिवस गेला असेल. नसेल तर नक्कीच जाईल. मग तयार रहा वाजवायला धोक्याची घंटा ऽ ऽ ऽ

■



# अवकाळी पाऊस

**वैभव बेलदार**
**इ. ८ वी**


गोष्ट २०१० सालची. परीक्षा संपत आली होती. शेवटचा पेपर भूगोलचा होता. शाळेत सगळीकडे उन्हाळयाच्या सुट्टीत काय करणार हा विषय रंगला होता. मी तेव्हा चौथीत होतो.

आमची परीक्षा झाली. उन्हाळयाच्या सुट्टया सुरू झाल्या. खूप ऊन पडत होते. आम्ही दरवर्षी उन्हाळयाच्या सुट्टीत मामाच्या गावाला पोत्र्याला जातो. हे एक छोटेसे खेडेगाव आहे. या खेडयाच्या चारही बाजूने घनदाट झाडी आहे. निरोगी वातावरण असते. सकाळी मोर व इतर पक्ष्यांचा किलबिलाट असतो. तीन डोंगरांत वसलेले हे गाव आहे. या गावाला आम्ही डोंगरावरती फिरतो. तिथे आम्ही बिबे खातो. मोराची पिसे गोळा करतो. पोपट पकडतो. खूप मजा येते. यामुळे मी पोत्र्याला जायची संधी कधी चुकवत नाही.

आमचे सर्वांचे पोत्र्याला जायचे ठरले. यावेळी आम्ही बसने जायचे ठरवले. आम्ही रेल्वेने जायचो पण रेल्वेने २ दिवस लागायचे व बसने एक दिवस लागायचा. यामुळे आम्ही बसने जायचे ठरवले. आम्हाला न्यायला मामा आला होता. पण वडिलांना अचानक काम आले. त्यामुळे वडिलांनी मामाला, आईला व बहिणीला पुढे पाठविले. वडील आणि मी काम उरकून चार दिवसांनी निघालो. आम्ही फलटणमधून पंढरपूरला गेलो. तिथून लातूरची बस पकडली आणि निघालो. इंदापूरच्या पुढे अचानक पाऊस सुरू झाला. पावसाचे दिवस नव्हते. पण पाऊस खूप जोरजोरात पडू लागला. मी वडिलांना विचारले की असा अचानक पाऊस कसा काय आला? पावसाचे दिवस नाहीत. वडील म्हणाले की या पावसाला अवकाळी पाऊस म्हणतात. आम्ही जसजसे बार्शीपर्यंत जाऊ लागलो तसतसा पाऊस वाढला. एकदाचे आम्ही बार्शीला पोहोचलो. तिथून लातूर जवळ होते. आम्ही बार्शीच्या बस स्थानकावर गेलो. तिथे बस स्थानकावर पाणीच पाणी होते. लोक गाडीतून खाली उतरत नव्हते इतका पाऊस होता. बसस्थानकावरील बरीच दुकाने बंद होती. बस तिथून लगेच निघाली. आम्ही लातूरला गेलो. लातूरला पण खूप पाऊस चालू होता. लातूरच्या अलिकडे असलेल्या मांजरा नदीलापण पूर आला होता. पण नशीबाने आम्ही ती नदी ओलांडली. आम्ही तिथून नांदेडला निघालो. नांदेडला जाताना आमच्या बसचा टायर पंक्चर झाला. पाऊस खूप जोरात चालू होता. आम्ही भर पावसात खाली उतरलो. मला एका आजोबांनी त्यांच्या छत्रीखाली घेतले. तेवढयात मागून एक

नांदेडला जाणारी बस आली. आम्ही त्या बसने नांदेडला गेलो. नांदेडमध्येपण खूप पाऊस चालू होता. आम्हाला नांदेडवरून बाळापूरला ५० कि. मी. जायचे होते व बाळापूरहून पोत्रा

पाणी होते. कारण रात्रभर पाऊस पडत असल्यामुळे गोदावरी नदीला पूर आला होता. वडिलांना वाटले की मी इथे राहणे ठीक नाही त्यामुळे त्यांनी ठरवले की परभणीला त्यांच्या



१० कि. मी. होते. पण रस्ता अतिवृष्टीमुळे बंद होता. आम्ही मामाला फोन करायचा प्रयत्न केला पण रेंज मिळत नव्हती. एकदाची रेंज आली व मामाला फोन केला व हे सर्व सांगितले. मामा म्हणाला माझा एक मित्र आहे तुम्ही त्याच्याकडे थांबा.

वडील खूप चिंतेत होते. मला काही होणार नाही याची ते पुरेपूर काळजी घेत होते. मला थंडी वाजत होती. आम्ही तो दिवस चहा आणि पार्ले बिस्किटांवर काढला. आम्हाला मामाचा मित्र नांदेड बस स्थानकावर न्यायला आला. त्याने आम्हाला कसेबसे हुडकले व आम्ही त्याच्या रूमवर रहायला गेलो.

सकाळी उठलो तर खाली सगळीकडे

मित्राकडे राहायला जायचे. मला वडिलांनी त्यांच्या खांदयावर घेतले. तिथे एक हॉटेल होते. तिथे आम्ही चहा बिस्किट खाऊन निघालो. आम्ही रेल्वेने परभणीला निघालो. वडिलांच्या मित्राकडे पोहोचलो व तिथे आम्ही दहा दिवस राहिलो. कारण आम्हाला परत पण जाता येत नव्हते. मांजरा नदीला पूर आल्यामुळे मामाकडे पण जाता येत नव्हते.

पुराचे पाणी ओसरले हे आम्हाला कळल्यावरच वडील, मी आणि वडिलांचा मित्र असे आम्ही तिघे टू-व्हीलरवरती निघालो. आम्हाला पुढे गेल्यावर एक ओढा लागला. त्या ओढयाच्या पुलावरून पाणी वहात होते. ओढयाच्या पलिकडे एक माणूस

उभा होता. तो माणूस म्हणाला काही होणार नाही. लांबून गाडी फास्ट आणा व ओढयाच्या पलिकडे निघा. आम्ही गाडी लांब नेली. मला खूप मजा येत होती. गार हवा लागायची. पाणी अंगावर उडायचे. पण वडिलांना फार टेन्शन यायचे. आम्ही कसेबसे असे तीन ओढे पार केले व मामाच्या गावाला पोहोचलो. मामाच्या गावाला आम्ही २५ दिवस राहिलो. नंतर फलटणला आलो. फलटणला येताना आम्ही रेल्वेने आलो. हा आमचा प्रवास एकूण ३७ दिवसांचा होता. हे सर्व झाल्यापासून वडील आणि मी ३ वर्ष झाली अजून गावाला गेलो नाही.

---

## माणुसकी

आज जगात कुठे हरवली आहे माणुसकी
माणसा माणसात सुद्धा उरलेली नाही आपुलकी
हव्यासाचं जग रहातयं उभं आज
त्यामुळे बदलतोय माणुसकीचा अर्थ जगात
माणुसकीला उरलेली नाही कुठे किंमत
कारण पैशाची चालली आहे जगात हुकुमत
कागदांच्या नोटांसाठी,
स्वतःच्या जगण्यासाठी,
माणूस माणुसकीला विसरतोय.
कारण पैसा बोलतोय,
माणुसकीचं तोंड दाबतोय.

**अक्षदा फणसे**
**इ. ८ वी**

# सोमवती अमावस्या

**राहुल राऊत**
**इ. ८ वी**

आमच्या गावात अशी प्रथा आहे की एखादया महिन्याला सोमवारी अमावस्या आली की ती सोमवती अमावस्या. त्या दिवशी गावातून पालखी निघते. गावभर फिरून ती संध्याकाळी परत येते. गावजेवणही होते. निदान वर्षातून दोनदा तरी ही सोमवती अमावस्या येते.

दर सोमवतीला ढोल आवळण्याचे काम मी आणि माझे मित्र करतो. ढोल वाजवायलाही आम्ही असतो. पालखीच्या पुढे ढोल वाजवतात. सर्व ढोलवाले चाल ठरवूनच ढोल वाजवतात. त्यामुळे पालखी सर्वांचे लक्ष वेधून घेते.

ही पालखी आमच्या रानाच्या शेजारून वाजत गाजत जाते. ती नदी पार करून मलठणमधून कॅनॉलपर्यंत जाते. मग तिथे पालखी उतरवून, देवांना आंघोळ घालायची. मग सर्वांनी आंघोळ करायची. देवांची आरती करायची. आरती झाल्यावर गुलाल उधळायचा आणि मग आल्या रस्त्याने परत फिरायचे.

गावात गेल्यावर ठरवून दिलेल्या घरापुढे सतरंजी अंथरून ठेवलेली असते. त्यावर पालखी ठेवायची. असा आख्ख्या गावाला राऊंड होतो. भिकारमळयापासून ते हिंगवण्याच्या वाडयात, नाळे वस्तीतून, बोराटे वस्ती अशी सर्वत्र पालखी फिरते.

गावातील सर्व लहान–मोठी माणसे यात



सहभाग घेतात. प्रत्येक घरी सर्वांसाठी नाष्टा नाहीतर चहा असतो. भरभर पुढे जायचे असल्यामुळे चहा पिताना जिभेला चटका बसतो. त्यामुळे दोन दिवस काही खाल्ले तरी तिखटच लागते.

शेवटी पालखी फिरत–फिरत देवळात येते. पुन्हा एकदा गुलाल उधळतात. दर सोमवतीला कोणाचे ना कोणाचे जेवण असते. पालखी देवळात ठेवल्यावर प्रमुख आजोबांच्या अंगात येते. त्यात ढोलाचा दणका पण खूप जोरात असतो. देवळाच्या आवारात दणकून आवाज घुमतो. अंगात आलेल्या आजोबांच्याबरोबर प्रश्नोत्तरे होतात. पाऊस–पाणी, गावाचे भले याबद्दल प्रश्न विचारतात. हे सगळे संपल्यावर गावजेवण (महाप्रसाद) होतो. खरे म्हणजे मला ढोल वाजवायला आवडतो. पण सोमवारी शाळा असते ना. तरी मी सकाळी ढोल आवळण्याचे काम करूनच शाळेत येतो. शाळेतही आता पालखी कुठवर आली असेल असे वाटत राहते. जमले तर शेवटच्या तासाला किंवा शाळा सुटल्यावर सायकल ताणत ताणत जाऊन नदीवर थांबतो. पालखीची चाहूल घेऊन घरी जाऊन, भरभर सारे उरकून भिकारमळ्यापर्यंत जाऊन थांबतो. पालखी आली रे आली की लगेच ढोल गळयात घेतो, ते कार्यक्रम संपेपर्यंत. ■

---

# सभोवती

एक मोठी लायब्ररी
लायब्ररीत पुस्तके
पुस्तकात चित्रे
चित्रांना रंग
मुले पहायला सभोवती
मुले पहायला.

**रिया गोळे**
**इ. १ ली**

एक मोठा नकाशा
नकाशात गावे
गावात गाडया
गाडयांची पिप–पिप
माणसे ऐकायला सभोवती
माणसे ऐकायला.

**ओजस निंबाळकर**
**इ. १ ली**

# रविवारचा दिवस

ऋतिक माने
इ. ८ वी

रविवारचा तो दिवस. सर्व मुले घरी होती. गोट्या खेळायच्या ठरवल्या. सगळी मुले सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे गेली. डाव चालू झाला. एक-एक गडी बाद झाला. डाव रंगत चालला होता. बाद झालेली मुले प्रोत्साहन दयायला होतीच. डाव अर्धा-एक तास चालला होता.

अचानक विजा कडकडायला लागल्या. वाटणी करून घ्या असे मुले म्हणत होती. पण खेळणारी मुले त्यांच्याकडे लक्ष देत नव्हती. एक-एक थेंब खाली पडू लागला. आता भराभर थेंब गळाय लागले. कडेच्या मुलांनी रेड म्हणून डावातल्या सगळ्या गोट्या उचलून नेहल्या. नाय म्हणता म्हणता चारपाचशे गोटया गायब केल्या. मी ही माझा डाव काढून घेतला. तवर पाऊस जोरदार सुरू झाला. म्हणून आमची आणि प्राण्यांची पळापळी सुरू झाली. पूर्ण रोडवर जनावरं आणि आम्हीच होतो.

पाळलेली कुत्री आपापल्या पिंजऱ्यात गेली. त्यांच्याबरोबर रस्त्यावरचे दुसरे कुत्रेपण आत जायला बघत होते. पण मालक पावसात भिजत येऊन कुत्र्याला बाहेर काढत होता. विजा कडाडत होत्या. गोठ्यात गायी बिथरत होत्या.

**पान ३३ वर.**



# दुनिया पक्ष्यांची

**ऋषिकेश जाधव**


**इ.९ वी**

आजकाल आपण पहात आहोत की शहरीकरण हे झपाटयाने वाढत आहे. निसर्गात त्याचे मोठे पडसाद उमटत आहेत. याचा परिणाम क्रमाक्रमाने झाडे, प्राणी, पक्षी यांवरही होत आहे. पण पक्षी या बदलांबरोबर जुळवून घ्यायला शिकले आहेत.

पक्ष्यांची दुनिया ही फार अजब व मजेदार. मी जिथे राहतो त्या कोळकीच्या अतिपूर्वेकडील भागात आजही शेते, झाडे, ओढे आहेत. त्यामुळे येथे मोठया प्रमाणात पक्षी आढळतात. आमच्या येथे लालबुडया बुलबुल, सुगरण, रेड मुनिया, आयोरा, सनबर्ड, पोपट, कोळसा, खंडया, होला, पारवा, साळुंखी, ब्राम्हणी मैना, चिमणी, कोकिळा, टिटवी, हळदया इ. पक्षी आढळतात. मला मोठया पक्ष्यांपेक्षा लहान पक्ष्यांविषयी जास्त कुतूहल वाटते कारण हे पक्षी खूप सुंदर, खटपटी व हुशार असतात.

लालबुडया बुलबुल हा पक्षी आमच्या इथे बहुसंख्य प्रमाणावर आढळतो. पण का कोण जाणे मला या पक्ष्याचे घरटे नेहमी कमकुवतच वाटते. एकदा एका जोडप्याने आमच्या जिन्यात घरटे बांधले. तेही फक्त एका कपडे वाळवण्याच्या तारेच्या आधारावर. ते घरटे सहज माझ्या हाताला येत होते. शेवटी एके दिवशी पिले झाल्यावर ते घरटे तुटून खाली पडले. तेव्हा आमच्या मांजराची चांगलीच मेजवानी झाली. तसेच एका जोडप्याने आमच्या दारातील गुलाबाच्या फांदीवर घरटे बांधले. झाड काही खूप मजबूत नव्हते. त्यात दिवस पावसाळ्याचे. जेव्हा पाऊस पडू लागला तेव्हा मादी अंडयांवर बसली व त्यांना पावसापासून वाचवू लागली. नर भिजत इकडे तिकडे नुसताच घिरटया घालू लागला. या लालबुडयापासून मी एक गोष्ट चांगलीच समजलो. हे पक्षी जोडीने एकमेकांची साथ कधीही सोडत नाहीत. संकटांना एकत्र तोंड देतात. डगमगत नाहीत.

आमच्या येथे जुनाट बांधकाम असलेली एक विहीर आहे. त्याला बारा महिने पाणी असते. त्या काठी भरपूर खंडया घरटी बांधतात. त्यामुळे येथे पांढऱ्या छातीचे भरपूर खंडया आहेत. हे पक्षी खूप हुशार असतात. एकदा मी आमच्या डाळिंबाच्या बागेत दाऱ्यावर होतो. मी पाणी लावून झाडाखाली बसलो. वेळ दुपारची होती. मला खट्– खट् असा आवाज आला. मी मागे वळून पाहिले तर एका झाडावर एक खंडया आपलीच चोच आपटत होता. मी जरा नीट पाहिले तर त्याच्या चोचीत एक काळा किडा होता. त्याचे कठीण कवच तोडण्यासाठी तो किडयाला चोचीत पकडून



चोच आपटत होता. मी हे बघून चकित झालो.

विणीच्या हंगामात सर्व पक्षी कामात व्यस्त असतात. सुगरणी आपले सुंदर घरटे बांधण्यासाठी धडपडत असतात. मी एकदा सकाळी सकाळी ओढयाकाठी गेलो होतो. काही सुगरणी सतत ओढयाच्या या काठावरुन त्या काठावर उडत होत्या. मी जरा जवळ जाऊन पाहिले. त्या एका काठावरील उसाच्या रानातून उसाच्या पात्याचा एक बारीक तंतू काढून आणायच्या व त्या काठावरील बाभळीच्या झाडावरील आपल्या घरटयात तो विणायच्या. हा त्यांचा नित्यनेम चालूच होता. वाटेत मध्येच तंतू पडला तर त्या माघारी जायच्या. आपल्या येणाऱ्या पिढीसाठी त्या खूप कष्ट करत होत्या.

पाऊस पडून गेल्यानंतर उजाड माळरानावर सुंदर गवताचा गालिचा पसरलेला असतो. त्यावर अनेक रानफुले मन वेधत असतात. त्यावर रेड मुनिया थव्याने खुळखुळ असा घुंगरासारखा आवाज करत असतात. बगळे, साळुंख्या किडयांच्या शोधात उडत असतात. प्रत्येकजण आपापल्या कामात व्यस्त असतो. निसर्ग हा असाच आहे. जो कष्ट करतो तोच येथे टिकतो. पण यातही युक्ती वापरावीच लागते. पक्षीही तेच करतात व आपले जीवन जगतात. पण यांची दुनिया पाहताना, जाणताना मिळणारा आनंद काही वेगळाच असतो.

■

# गावाकडचा तमाशा

**अभयसिंह सोनवलकर**

**इ. ५ वी**

परीक्षा संपली होती. पेपर छान लिहिले होते. त्यामुळे मी खूप आनंदी होतो. त्यातच फलटणवरून मला दुधेबावीला जायला मिळणार होतं म्हणून आणखीनच आनंद झाला होता. काका त्याच्या हापीसवरून आले आणि मला व मोनूदादाला घेऊन दुधेबावीला जायला निघाले. रस्त्यावरून गार वारा अंगाला झोंबत होता. एकदाचे आम्ही दुधेबावीला पोहचलो. आमच्या वाडयात अनेकजण जमा झाले होते. सूरपाट्यांचा डाव रंगला होता.

सकाळ झाली. जत्रेचे दिवस सुरू झाले. अनेक नवे मित्र मला मिळाले होते. मित्र मोठया मोठया गप्पा मारत होते. माझ्या बाबांनी हे नवीन आणले, ते नवीन आणले. दुसरा लगेच म्हणत होता, माझे बाबा मला नवीन चारचाकी गाडी आणणार आहेत. लगेच तिसरा मित्र म्हणत होता, माझे बाबा ट्रकच घेणार आहेत. या नुसत्या पोकळ लाखाच्या गप्पा सुरू झाल्या होत्या. त्याचं कसं आहे ना, "लाखाशिवाय बात नाही, वडा पाव शिवाय खात नाही."

गावात तमाशाचा दिवस होता. लोकांची तुंबळ गर्दी झाली होती. गाव गजबजून गेलं होतं. देवाला बकरी, बोकड कापली होती. गावात आमच्या सूरपाटया सुरू होत्या. या खोलीतून त्या खोलीत आमची नुसती पळापळी सुरू होती. छोटी–छोटी कामं केली तर केली नाहीतर तसंच पळत सुटत होतो. तेवढयात काकांचा घरात प्रवेश झाला. काकाही आमचे गमतीदार व्यक्तिमत्व. ते आम्हा मुलांना म्हणाले, "काय रे पळापळ सुरू आहे? कामाला थोडासा हातभार लावा. तुमचं म्हंजे कसं, कामाला कधी–कधी आणि खायला आधी!"

गावाकडची मंडळी आमची आस्थेने विचारपूस करत होती. आमच्या शेजारची व्हंजी मात्र जास्तच चौकशी करत होती. जसं की, चहाला नाय कप बशी, नुसती उठाबशी. ना घेणं ना देणं, मोकळयात लेणं लावत होती.

रात्रीची जेवणं झाली. गावातील तमाशाची वेळ झाली. आम्ही मुलं पांघरूण घेऊन तमाशाला जाणार होतो. मटणावर मस्त ताव मारून तमाशाला गेलो. सरपंचांनी तमाशाचा नारळ फोडला. तमाशा सुरू झाला. तरूण मुले जागेवर नाचायला लागली. शिट्टयांचा आवाज सुरू झाला. परिसर दणाणू लागला. मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडू लागला होता. एवढयात कोणीतरी छोटे–छोटे दगड स्टेजवर टाकले. तमाशा थांबला.

पोलिस पाटील स्टेजकडे धावले. पोलिस पाटलांनी तरूणांना दम टाकला– तमाशा सुरू

करणार नाही. सगळीकडे शांतता पसरली. आता पाटलांच्या म्हणण्यावर सगळं होतं. आम्ही नाराज झालो होतो. यावेळी आमचे काका व प्रतिष्ठित गावकरी एकत्र आले. पाटलांची समजूत काढली. तमाशा सुरू झाला. पुन्हा सगळयांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला. पुन्हा तमाशाचा आनंद सगळेजण घेऊ लागले. तमाशा केव्हा संपला ते कळलेच नाही. कारण तोपर्यंत आम्ही झोपी गेलो होतो.

■

---

**रविवारचा दिवस २९ वरून**

पाऊस येतच होता. कुत्री, गाया घरी गेली पण गाढवांचे मात्र अवघड होते. कारण गाढवांना पिंजरा नाही आणि घरही नाही. त्यामुळे पावसाच्या विरुद्ध दिशेला भिंतीच्या कडेला गाढवे थांबली होती. जसजसा पाऊस फिरत होता तसतशी गाढवे वळत होती.

रविवारचा बाजारचा दिवस असल्याने गावात सगळ्यांची पळापळी चालली होती. आपापला बाजार भरायचा चालला होता. गावाकडचे लोक एका आडोशाला बसून बाजार भिजलाय का ते बघत होते. रोडवरून पळत जाताना गटारे दिसत नव्हती त्यामुळे काही कळत नव्हते.

मी आमच्या घरी भिजत गेलो. घरच्यांनी बाहेरच उभे केले. मी कपडे काढली. पाऊस वाढत गेला.

मी घरात गेल्यावर टी. व्ही. चालू केला. आवाज कितीही वाढवला तरी काहीच ऐकू येत नव्हते. त्यामुळे पावसाकडे व गटारे किती भरलीत तेच बघत होतो. असा सगळा रविवार वाया गेला.

■

# Interesting Holidays

**Rohan Taware**

8th

This diwali I learnt something new. I learnt fishing! I had gone to Somanthali. My grandfather lives there. I went to the stream for fishing. I used a fishing line for catching fish. I had put an earthworm as a bait. I caught 3.5 kg fish! This was my biggest catch! I was very happy.

After some days I went to Garpirwadi. There I played cricket and hide and seek with my many friends. We decided to make a fort. We collected things like stones, soil, water and old insecticide bottles. We made a beautiful fort. But then my brother came and destroyed it. He collected the things used for the fort and made a new fort better than ours. It was a very beautiful fort but I was a little angry.

I also worked in holidays. I liked this work. I had to pluck the marigold flowers and then sell them in the market. I had real fun plucking flowers. I helped my uncle to sell the flowers near Ram temple and in Ambedkar chowk. We sold them all! Not a single flower was left. I enjoyed this work a lot.

On the last night of diwali I went to the canal to catch crabs with my friends. We were many people but we could catch only 10 crabs because there were some small children with us. They went running ahead and chased away all the crabs. So we were irritated. But then they saw a snake and came running back. So we could catch at least 10 crabs! Also these small children were scared because of the darkness so we had to return early. Now we have decided that we will never take small children with us for crab catching!

# Beautiful Smile

**Prajakta Mane (7th), Mrunal Salunkhe, Madhura Ghanwat (6th)**


Our granny's name is Natalia. She is very sweet. She was born in Columbia so she can speak Spanish too. We have taught her some Marathi words and she has taught us some Spanish words. She tells us about many things like what are Boreal lights, different types of calendars, desserts, pink dolphins, who is Santa Claus etc. In one session she showed us many pictures of cakes. Our mouths watered by seeing those nice cakes.

Natalia granny is very creative. Her hobby is stitching. She also likes to collect earrings. She has collected more than 250 beautiful earrings.

We like her smile and her expressions. She laughs a lot. One day when she came on skype we told her a joke. But she didn't laugh. We asked her, "Why aren't you laughing?" Then she showed us her cheeks. They were swollen. That was our last session because she is going to do her Ph.D and she will not come on Skype now. We said *chaoo* (bye in Spanish) to her and she said *tata*. We will really miss her and her beautiful smile.

■





आफ्रिका खंडाच्या आकाराचे तोंड असलेला गेंडा

इयत्ता सहावीच्या भूगोलात पृथ्वीवरील खंडांचा भाग अभ्यासास आहे. खंडांचे आकार वेगवेगळे असल्याने मुलांना ते लक्षात ठेवणे कठीण जाते. त्यासाठी वर्गामध्ये आम्ही एक शक्कल लढवली. प्रत्येक खंडाचा नकाशा रेखावृत्त व अक्षावृत्तानुसार रेखाटायचा, त्यामध्ये काही थोडेफार बदल करून तो आकार पाहून आपल्याला काय आठवते त्याचे चित्र तयार करायचे अशी कल्पना मुलांसमोर मांडली. मुलांना ही कल्पना खूपच आवडली.


मुलांच्या कल्पनाशक्तितून खंड वेगवेगळ्या आकारात रेखाटले गेले. कुणी घोड्याच्या तोंडाचा तर कुणी बाईच्या चेहऱ्याचा आकार रेखाटला. कुणी खंडाच्या आकाराला वेगळी जोड देऊनही चित्र बनवले. या बरोबरच मुलांनी त्या त्या खंडाविषयी थोडी भौगोलिक वैशिष्ट्येही ग्रंथालयातून आणि इंटरनेटवरून शोधून काढली.

प्रत्येक खंडाला मुलांनी दिलेल्या नव्या ओळखीमुळे तो खंड मुले कधीच विसरणार नाहीत हे नक्की!

**विशाल आंधळकर**




दक्षिण अमेरिका खंडाच्या आकारातून बनलेली बाहुली, सिद्धी शिरोळकर, इ. ६ वी



ऑस्ट्रेलिया खंडाच्या आकाराचे तोंड असलेला सिंह, चैतन्य राऊत, इ. ६ वी